झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तां१/२११०/२०२४
दिनांक : ३० /०८/२०२४.

835

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रशासकीय मान्यता)

(विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये)

प्रस्तावना :

गाव घोरपडे पेठ, टी.पी.स्कीम नं ३,फायनल प्लॉट क्र.२८१ ते २८४,(स.नं.५२६/१८) येथे वसलेली झोपडपट्टी संदर्भात १३००.०० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. स्पायर व्हेंचर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. ०५/०५/२०१५ रोजी सदर मिळकतीवरील प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत प्रस्तावाची छाननी करून झोपडीधारकांच्या ७०% संमतीसह दि.१४/०६/२०१९ रोजी प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

१) सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत दाखल प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फ़त दि.२५/०७/२०२४ रोजी मंजूर नियमावली २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/ सूचना अथवा तक्रार प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही. याप्रकरणी कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारणेबाबत प्रसिध्द अधिसूचनेसंदर्भात दाखल केलेली हरकत स्वतंत्रपणे फेटाळण्यात आली आहे.

२) दि.२५/०७/२०२४ रोजी निर्गमित केलेल्या प्रारूप योजनेतील सर्व बाबींचा अंतर्भाव करून सदर प्रारूप योजना अंतिम करण्यात येत असून सदर योजनेस प्रारूप योजनेतील सर्व शर्ती-अटीलागू राहतील या निर्देशासह योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेत आवश्यकतेप्रमाणे होणारे बदल झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस /प्रतिनिधींना वेळोवेळी अवगत करणे विकसकावर बंधनकारक राहील.

३) सदर योजनेद्वारे विकसक मे. स्पायर व्हेंचर्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून, विकसकांनी झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व नियमावली-२०२२ मधील तरतूदीस अधिन राहून योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले सर्व व्यवस्थापन व होणाऱ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी विकसकाची राहील.

४) सदर योजनेचे विकसक मे. स्पायर व्हेंचर्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. योजना अंमलबजावणी संदर्भातील शासनाचे तसेच अन्य सर्व संविधानिक प्राधिकरणे व झो.पु.प्राधिकरणाचे सर्व

नियम लागू राहतील.अशा सर्व प्राधिकरणाकडून देण्यात येणाऱ्या निर्देशांचे/आदेशाचे अनुपालन करणे विकसकावर बंधनकारक राहील.

५) झोपडपट्टी अधिनियमातील कलम ३ (ड) अन्वये झोपडपट्टी निर्मुलनाचे आदेश पारीत झाल्यानंतर, योजनेसंदर्भात प्राप्त होणाऱ्या बांधकाम प्रस्तावास अनुसरून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत निर्णय सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे झाल्यास ते शीर्षस्थ तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे दाखल करता येईल, याची नोंद घ्यावी.

सदर प्रशासकीय मान्यता ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
30/8/24

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- ३०/०८/२०२४

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका.
२. विकसक - मे. स्पायर व्हेंचर्स, सि.स.नं.६९३, कुदळे पार्क, एच.डी.एफ.सी. बँक शेजारी, क्वार्टर गेट, नाना पेठ, पुणे-४११००२.
३. घोरपडे पेठ, टी.पी.स्कीम नं.३, फायनल प्लॉ.क्र.२८१ ते २८४ (स.नं.५२६/१८) येथील योजना झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येत आहे.